आर.सी.सी.क्रं.६७१/२०१९
नि. क्रमांक २७.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :-

माझे नाव :- दत्तात्रय ज्ञानोबा माळी,

वय सुमारे :- ४९ वर्षे, व्यवसाय :- शेती ,

निवासस्थान :- चांदखेड, ता. मावळ, जि. पुणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. एस. पवार यांच्यामार्फत**

**०१.** मी चांदखेड येथे माझे आईवडील, माझा भाऊ व त्याची मुले असे मिळून राहतो. माझ्या कुटूंबाचा व्यवसाय हा विटभट्टी, जेसीबी व शेती असा आहे. मी आरोपींना ओळखतो कारण ते माझ्या गावातील रहिवाशी आहेत. आमचा विटभट्टीचा व्यवसाय असल्यामुळे विटभट्टीच्या व्यवसायासाठी भाडयाने जमीन सुधीर बारमुख यांच्याकडून घेतली होती. सन २०१९ मध्ये दि. २०/०८/२०१९ रोजी माझी आई अरुणा माळी इतर मजुरांसोबत विटभट्टीच्या जमीनीवर भुईमूग कुरपण्यासाठी गेली होती. माझी आई सकाळी १०.३० वा च्या सुमारास कुरपत असतांना आरोपी हे गुरे चारण्यासाठी आमच्या शेतामध्ये आले होते.

**०२.** आरोपींनी भुईमूगाच्या राणामध्ये गुरे घातल्याने माझ्या आईने त्यांना थांबवले असता आरोपींनी माझ्या आईला अश्लील भाषेत शिवीगाळी केली. आरोपींच्या हातामध्ये लोखंडी रॉड होता. आरोपी श्रीकांत चंद्रकांत गायकवाड माझ्या आईस म्हणाला की, लोखंडी रॉड तुझ्या गांडीत घालतो. माझ्या आईसोबत असलेल्या महिलांनी भांडणे सोडवण्यासाठी प्रयत्न केला असता आरोपींनी त्यांचेदेखील ऐकले नाही. सदर कालावधीमध्ये मी गावचा पोलीस पाटील होतो. आरोपी माझ्या आईस म्हणाले की, तुझा मुलगा पोलीस पाटील कसा राहतो ते बघतो. त्यानंतर त्याने माझ्या आईचा हात ओढला. माझ्या आईचा हात ओढला असता सोबत असलेल्या महिलांनी सोडवण्याचा प्रयत्न केला परंतू आरोपींनी त्यांचेदेखील ऐकले नाही.

**०३.** घटनेच्या दिवशी दुपारी २.३० वा च्या सुमारास आई घरी आल्यानंतर घडलेली घटना मला सांगितली. मी व माझा भाऊ रामकृष्ण माळी आरोपींना जाब विचारण्यासाठी गेलो असता तेथे श्रीकांत गायकवाड, शिवदत्त गायकवाड व त्यांचे वडिल चंद्रकांत गायकवाड असे होते. मी त्यांना जाब विचारला असता आरोपी श्रीकांत गायकवाड याने मला रॉडने  हातावरती व मांडीवरती मारहाण केली. माझ्या भावास शिवदत्त गायकवाड व चंद्रकांत गायकवाड याने लाकडी काठीने मारहाण केली. आरोपी मला म्हणाले की, तु पोलीस पोटील कसा काय राहतो ते आम्ही बघतो. घटनेनंतर आम्ही पोलीस ठाण्यात जाऊन आरोपींविरुध्द अहवाल नोंदवला. तपासादरम्यान पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. रौंधळ यांच्यातर्फे शपथेवर सुरु.**

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, सुधीर बारमुख यांची जागा हि विटभट्टी व शेतीसाठी भाडयाने घेतली होती. भाडयाने जमीन ही तोंडी कराराने घेतली होती. विटभट्टी ही माझा भाऊ चालवत होता. हे म्हणणे खरे आहे की, विटभट्टीच्या अलिकडे आरोपींची जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे त्यांच्या जमीनीमध्ये शेतीची कामे करत होते. भांडणाची घटना हि माझ्या आईने घरी आल्यानंतर आम्हाला सांगितली होती. घटनेबद्दल प्रत्यक्ष मला काही माहिती नव्हती. विटभट्टीपासून आमच्या घरामधील अंतर हे चालत ५-७ कि मी आहे. आरोपींची किती गुरे आमच्या शेतामध्ये आली होती हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घडलेली घटना हि मला माझ्या आईने सांगितली होती. घटनेपूर्वी आमच्यामध्ये व आरोपींमध्ये शेतीच्या मुद्दयावरुन किंवा राजकीय कारणावरुन भांडणे झाली नव्हती.

**०५.** आरोपींनी माझ्या विरोधात ग्रामपंचायतचा फॉर्म वगैरे भरला नव्हता. आरोपींनी माझ्यावर घटनेबाबत क्रॉस तक्रार केली होती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या शेतामध्ये आरोपींची जी गुरे आलेली होती त्यांना दो-या बांधलेल्या नव्हत्या. राहते घर ते हॉस्पीटलमधील अंतर हे १५-२० कि मी चे आहे. भांडणानंतर आम्ही प्रथम पोलीस ठाण्यात गेलो होतो.हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस पाटील असल्यामुळे अनेक खटल्यांमध्ये

साक्षीपुरावा दिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस पाटील असल्यामुळे माझा पोलीस ठाण्यात जाण्यायेण्याचा व पोलीसांशी संबंध होता.

**०६.** हे म्हणणे खरे नाही की, भांडणाची कोणतीही घटना घडली नव्हती व केवळ आरोपींची गुरे आमच्या शेतामध्ये आल्यामुळे आरोपींविरुध्द गुन्हा नोंद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या आईस त्रास दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे लिहून घेतला व माझी त्यावर सही घेतली. हे म्हणणे खरे आहे की, साक्षीदार अरुणा, रामकृष्ण, दत्तात्रय व मनिषा हे माझ्या कुटूंबातील रहिवाशी आहेत.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

VISHNU RAMCHANDRA DOIFODE

Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Date: 2026.04.28 16:47:35 +0530

**दिनांक. २८/०४/२०२६.**

**(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**
**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**